गुलशन बावरा -भाग १

"मेरे गीतोंको भुला ना पाओगे तुम
हर गली मे इन्हे गूँजता पाओगे
मैने अपने हसीन गीतोंको
अपने बच्चोंकी तरह पाला है
इनको बेचा नही है कोठोंपे
इनको दिल से लगा संभाला है
इसलिय इनमे तुम अपनापन पाओगे

प्यार मीरा का मेरे गीतोंमे है
जो अब इस जहाँ मे अब नही मिलता
आजकल प्यार इक तिजारत है
काश वो प्या भी कही मिलता
जहर खाके भी अब तुम मर न पाओगे

मेरे गीतोंको भुला ना पाओगे तुम
हर गली मे इन्हे गूँजता पाओगे"

- गुलशन बावरा

काही गोष्टी आपल्याला अगदी अचंब्यातच टाकतात. गुलशन बावरा यांच्या यशाची वाटचाल तशीच आहे. गीतलेखनाची त्यांची कारकीर्द किती म्हणावी तर पुरी ४० वर्षांची आणि यामध्ये त्यांनी गीते किती लिहिली तर फक्त २४० ! म्हणजे वर्षाला ६ गाणी आणि दोन महिन्यांतून एकच गाणं ? १९७० पर्यंत त्यांनी अगदी थोडीच गाणी लिहिली. खरं तर त्यांच्याकडे उपजीविकेचे दुसरे कोणतेच साधन

नव्हते. तरीही ते सुस्थितीत होते असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्याकडे गाडी होती, व्यवस्थित सजावट केलेले घरही होते आणि आधुनिक सुखसोईही होत्या.

'हर खुशी हो वहाँ, तू जहाँ भी रहे' ह्या लतासाठी लिहिलेल्या सुरेख गाण्यासाठी खरंच आमचा तुम्हाला सलाम ! 'ऐ मेरी जान-ए-वफा, मैने देखा है ये क्या ...' हे मुकेशचे गाणे आणि तुमची आणखी कितीतरी गाणी ऐकून असे वाटते की ही गाणी तुम्हाला कशी स्फुरली ?

साठी ओलांडली तरीही गुलशन बावरा अगदी तिशीतल्या माणसासारखे तरतरीत होते. काही वर्षांपूर्वी आम्ही त्यांना चित्रपटांतून छोटी छोटी कामे करताना पाहिले होते, अगदी तसेच ते अजूनही दिसतात. उंच, आता डोळ्यांवर चष्मा आला, पण तरुणासारखी केशरचना आणि चेहऱ्यावरचे तेच खट्याळ हसू ! त्यांच्याशी बोलल्यावर त्यांच्याकडे किती विनोदबुध्दी आहे हेही तुमच्या लक्षात येईल.

कित्येक कप चहा आणि विनोदाची भरपूर पखरण अशी ही मुलाखत झाली. परंतु ह्या हास्य-विनोदामागे थोडे कारुण्यही होते. आणि आयुष्यातील चढउताराचे वर्णन करताना, आपल्या कडू-गोड भावना व्यक्त करताना ते आवाजातही बदल करीत. मुलाखत चालू असताना मी त्यांचे बोलणे ऐकण्यात गुंग होतो, पण नंतर माझ्या मनात उगाचच एक विचार येऊन गेला. त्यांच्या फावल्या वेळात त्यांनी 'अभिनय करताना आवाजात कसा फेरबदल करायचा' ह्याचे प्रशिक्षण द्यावे.

मुलाखत सुरूच होती. ते म्हणाले,

"१९७० पर्यंतच्या भारतीय संगीताची वाटचाल उत्तमच होती कारण ते करणाऱ्या लोकांकडे साधना होती आणि तपश्चर्या पण होती. त्यानंतर जे लोक आले त्यातल्या गीतकारांना आपण काय लिहावे तेच कळत नव्हते आणि संगीतकारांना संगीताची जाणच नव्हती ! पूर्वीचे लोक आपल्या कामाशी निष्ठा ठेवून होते. पूर्वी चित्रपटामध्ये लिहिण्यासारखे काहीतरी घडत होते आणि काम करणाऱ्या सगळ्यांकडे आपुलकी होती, एकत्र मिळून चांगले काम करण्याची भावना होती. कमी पैशातही सगळे समाधानी होते. आता दुकान उघडल्यासारखे वातावरण आहे. काय लिहायचे आणि संगीत काय द्यायचे ह्याबद्दल ते स्वत:च अनभिज्ञ आहेत. त्यामुळे ते हे सोडून कुठलाही व्यवसाय करायला तयार होतात. पूर्वी लोक आपल्या विषयाला चिकटून असत, कामावर प्रेम करीत. आतासारखी चापलूसी तेव्हा दिसत नसे. वातवरण पवित्र वाटे. आता या व्यवस्सयाला कोठ्याचे स्वरुप आले आहे. शंकर-जयकिशन यांनी जर ३॥ लाखांची मागणी केली तर ते त्याच योग्यतेचं संगीत देणारच हे निश्चित होतं. आताचे संगीतकार १० लाखापासून सुरुवात करतात, पण संगीताची पातळी मात्र ५०,००० इतकी पण नसते. ह्यांना आपल्याला नक्की काय करायचे आहे याची जाणच नसते. तुम्ही

एखाद्या संगीतकाराला सांगितले की अमूक एक गाणे बागेश्रीत तयार करा तर त्यांना राग बागेश्रीच माहित नसतो. एखाद्या गीतकाराला जर तुम्ही प्रसंगानुरूप गीतलेखन करण्यास सांगितले, तर त्याला ते जमेलच असे नाही."

मी - "रादिफ आणि काफिया ?"

ते - "त्याला ह्या दोहोंबद्दल काहीच माहिती नसली, त्याला 'जानम'चा अर्थ माहित नसला तरीही तो हा शब्द जिथे संधी मिळेल तिथे वापरत असतो. 'बेखुदी' हाही एक असाच शब्द आहे. माणेक, मला सांग, की मी हे सांगतोय ते खरं आहे की खोटं ?

पूर्वी पूर्वी चित्रपट निर्माते टक्के-टोणपे खाऊनच तयार झालेले असत आणि चित्रपटनिर्मितीबद्दल त्यांना अगदी मूलभूत माहिती अवगत होती. आता चित्रपटसृष्टीत २ नंबरचा पैसा खेळतोय ! पूर्वी अगदी प्रख्यात पृथ्वीराज यांचा मुलगा राज कपूर हा किदार शर्मा यांच्याकडे सहाय्यक म्हणून कामाला लागला होता. वेळप्रसंगी स्टुडिओत झाडू मारण्यापासूनची कामे त्याने केली आहेत. परंतु आताचे सहाय्यक 'बडे घरके बेटे' असल्याने स्टुडिओत मर्सिडीझमधून जातात."

मी - "हा बदल कसा काय घडला ?"

ते - "पहिले जे लोक आले त्यांना शिखर गाठण्यासाठी अमाप कष्ट करावे लागले. परंतु त्यानंतर त्यांनी आपल्या मुलांना कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये पाठवले आणि आता तर प्रत्येक छोट्या मुलाच्या हातात मोबाईल फोन आहे. आईवडिलांनी आगगाडीतून प्रवास केला तर मुले आता स्पोर्ट्स कारमधून फिरतात. सुबत्तेमुळे त्यांच्या हातात इतक्या सहजपणे पैसा आला की त्यांना त्याची फिकीरच वाटेनाशी झाली. अर्थातच त्यामुळे प्रेम, आपुलकी यांसारखे शब्दच नाहीसे झाले.

पूर्वीचे लेखक बघ - शकील, राजेंद्र कृष्ण ह्या कवींनी सुरेख कविता केल्या. पूर्वीचा विनोद अचरट नव्हता. 'हर ताले की चाबी राखे, हर चाबी का ताला, बडा ही सी. आय. डी. है, वो नीली छत्रीवाला' ही ओळ किती विलक्षण सुंदर आहे. आताचे गीतलेखक अशी गीते मनातही आणू शकत नाहीत. आजूबाजूचे वातावरणही असेच आहे. त्यामुळे विचारांनाही चालना मिळू शकत नाही. तुम्ही अगदी भरपूर काम हातात असलेले गीतकार असाल, तर तुम्ही एकच कल्पना वेगवेगळ्या प्रकारे लिहिणार, आणि तुम्ही नवखे उमेदवार असाल, तर तुम्हाला कोणी सृजनशील लेखन करूच देणार नाही. पूर्वीच्या निर्मात्यांकडे जाण होती. चांगले करण्याची आवड होती. राज कपूर, गुरु दत्त, तसेच एस. डी. बर्मन यांसारखे निर्माते लक्षात घे. एस. डी. यांना तर धड उर्दूही येत नव्हते, परंतु त्यांनी 'प्यासा' साठी दिलेले संगीत बघ. खरं तर 'प्यासा' चे हीरो तेच होते.

आणखी एक गोष्ट म्हणजे आता ते 'प्यासा' सारखा चित्रपट बनवूच शकणार नाहीत कारण त्यांनीच जनतेची आवड बदलून टाकली आहे. (आपले म्हणने पटवून देण्यासाठी आवाज हळू करून) सध्या तो चित्रपट चालणार देखील नाही. चालवूच देणार नाहीत. सैगल, शंकर-जयकिशन, ओ. पी. नय्यर, सी. रामचंद्र यांचा जमाना आता संपला आहे."

मी - "बरं, ते राहू देत. आपण पुन्हा त्या विषयाकडे येऊ. पण आता आपण तुमच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलूया. तुमची संगीताची सुरुवात कशी झाली आणि तुमची घरची परिस्थिती कशी होती याबद्दल सांगता का ?"

ते - "लाहोरजवळील शेखपुरा येथे १३ एप्रिल १९३८ रोजी माझा जन्म झाला. फाळणीच्या वेळी आम्हाला नवीन सरहद्द ओलांडून यावं लागलं. दु:खाची गोष्ट म्हणजे माझ्या आईवडिलांची माझ्या डोळ्यांदेखत हत्या झालेली मी पाहिली."

मी - "अरेरे ! फारच वाईट झाले."

ते - "हो, मी फक्त ९ वर्षांचा होतो. मला सुध्दा मार बसला. (शर्ट वर करून त्यांनी मला एक भला मोठा व्रण दाखवला.) माझा पाय पण त्यांनी कापला, बघितलात का ? पण मी फार जोराने धावलो. माझ्या मागे चार माणसे लागली होती. पण मी त्यांच्यापेक्षा जलद पळालो. मी आणि माझा मोठा भाऊ दोघेही तेथून सटकलो आणि जयपूरला आलो. तेथे माझी विवाहित बहीण रहात असे. तिने मला शाळेत घातले आणि मी हिंदीतून शिकू लागलो. यापूर्वी चौथीपर्यंत मी उर्दूतून शिकत होतो. माझी बहीण आणि तिचे यजमान यांनी आम्हाला वाढवले. माझ्या भावाला दिल्लीत नोकरी मिळेपर्यंत त्यांनी आमची काळजी घेतली. त्यानंतर मी भावाकडे दिल्लीला गेलो."

(क्रमश:)

- माणेक प्रेमचंद

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or

making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand, the author, has also recently written another music book called Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. To buy the books, you may go to jharnabooks@yahoo.com, and to write to the author, the email address is manekpremchand@gmail.com